ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय निवडणूकीमधील प्रसार माध्यमांची भूमिका



**प्रा.राहुल बी.सोनवणे**
**संगीत विभाग, नवगण कला व वाणिज्य महाविद्यालय, परळी-वै.**

## प्रस्तावना :-

१९ व्या शतकात तंत्रज्ञानामध्ये लक्षणीय क्रांती झाली. तंत्रज्ञानातील प्रगतीचा फायदा घेऊन नवीन प्रसार माध्यमे अस्तित्वात आली. त्यापैकी आकाशवाणी हे सर्वात प्रभावी प्रसार माध्यम आहे. या माध्यमाद्वारे आपल्या देशातील खेड्यापाड्यापर्यंतच्या व्यक्तीपर्यंत आपले विचार मांडण्याचे एक माध्यम ठरले. साक्षर, निरक्षर यांच्यापर्यंत संपर्क साधून संदेश पोहचविण्याचे काम आकशवाणीच्या माध्यमातून केले जाते.

दुसरे प्रसार माध्यम 'दूरदर्शन' होय. वर्तमानपत्रे, आकाशवाणी ही प्रमुख जनसंपर्कापर्यंत पोहचणारी माध्यमे असली तरी या माध्यमांना काही मर्यादा पडतात.

आकाशवाणीच्या तुलनेत दूरदर्शन हे अधिक प्रभावी माध्यम आहे. दूरदर्शन हे दृकश्राव्य पध्दतीने माध्यम असल्यामुळे त्यावरील कार्यक्रम पाहण्याची व ऐकण्याची अशी दुहेरी सोय दूरदर्शन हे माध्यमांद्वारे होत असते. जगाच्या पाठीवर कोठेही घडणाऱ्या घटना प्रसंगाचा आपल्या घरात बसून वेध घेऊ शकतो.

तसेच दै.वृत्तपत्र च्या माध्यमातून एखादा विचार जनतेपर्यंत पोहचवण्याचे प्रभावशील माध्यम समजले जाते. तसेच यु ट्युब, वाट्सअप, फेसबुक ही प्रसार माध्यमे सध्या वर्तमान काळातील अती प्रभावशील ठरत आहेत. या सर्व माध्यमांचा परिणाम भारतीय निवडणूकांवर प्रभाशीलतेने पडत आहे.

## लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसार माध्यम होय.

जनमत तयार करण्यापासून ते जनतेचा आवाज जनमाणसापर्यंत पोहचवण्याचे काम प्रसार माध्यम करतात. भारतीय प्रसार माध्यमांनी स्वतंत्रपूर्व काळापासून ते आजपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. टिळक, आगरकर पासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत प्रत्येक महापुरुषाने प्रसार माध्यमांचा प्रयोग केलेला दिसून येतो. The Time of India, The Hindu, केसरी, प्रबुध्द भारत असे अनेक वर्तमानपत्रामधून जनमतांचे साधन म्हणून पाहिले जात असे.

प्रसार माध्यमे हे जनतेत जागृती घडवून आणतात. या माध्यमाद्वारे जनतेला राजकीय शिक्षण प्राप्त होते. राजकरण प्रती जनतेत आवड निर्माण होते. २०१४ च्या निवडणूकीत प्रसार माध्यमांची भूमिका ही महत्त्वपूर्ण ठरलेली दिसून येते. आज मिडिया नावाचे क्षेत्र उद्योगपती आणि भांडवलदार वर्गाने बळकावले आहे. हे देशातील नागरिकांपासून लपून राहिलेले नाही. लोकशाही व्यवस्थेत परिवर्तन खूप महत्त्वाचे आहे. मग ते सत्तेतील परिवर्तन असो की अन्य मिडीयाने हमेशा सत्याची कास धरणे महत्त्वाचे आहे व जनतेने आपली मते (राजकीय जाणीव) मीडियाच्या सम्मोहनात न अडकता डोळसपणे ध्येय असणाऱ्या पक्षाला न्याय देण्याचे काम करावे.

आजच्या नव्या व्यवस्थेत भारतीय माध्यमे खास करून इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामध्ये वाटसअप, फेसबुक इ. चा उल्लेख दिसून येतो.

## प्रसार माध्यम -

**१) वर्तमानपत्रे -** भारत देशामध्ये वर्तमानपत्राची भूमिका स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतर अनेक वर्तमानपत्राच्या माध्यमातून जनतेचे हक्क व कर्तव्य पार पाडण्यासाठी केलेले काम दिसून येते. देशातील ग्रामीण भागातील सत्य परिस्थिती जनतेसमोर आणण्याचे काम वर्तमानपत्रांच्या माध्यमातून केले जाते.

सुरुवातीच्या कालखंडामध्ये अनेक वर्तमानपत्राच्या माध्यमातून अगरी परखड भूमिका मांडण्याचे कार्य वर्तमानपत्राच्या माध्यमातून झाले. त्यामध्ये केसरी, प्रबुध्द भारत, The Hindu अशी अनेक वर्तमानपत्र आहेत त्यांनी आपले कार्य सजगतेने केलेले आहे.

भारतीय निवडणुकीमधील भूमिकेसाठी या वृत्तपत्रांच्या माध्यमातून व्यक्ती निवडीचे कार्य त्यांनी केलेले समाज कार्य, एखाद्या राजकीय समुहाची दिशा, भविष्य, सामाजिक प्लॅनींग अशा सर्व गोष्टींचा विचार या वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेसमोर सत्य मांडण्याचे काम हे वृत्तपत्र करीत असते. त्यामुळे समाजाचा कल सत्यतेकडे झुकलेला दिसून येतो व खरे सामाजिक कार्य करणाऱ्या लोकनेत्यांच्या पाठीमागे जनतेचा लोंढा दिसत असे व त्याच पक्षांचा व नेत्यांचा विजय निश्‍चित होत असे.

आज वर्तमान कागदपत्रे The Hindu, लोकमत टाईम्स, दै.लोकमत, दै.सम्राट, दै.सामना अशा अनेक दैनिकानी भारती निवडणूकीमध्ये प्रसार माध्यमाची भूमिका सजगतेने पार पाडली आहे. जो पक्ष आपल्या अजेंडा प्रमाणे तत्त्वा प्रमाणे सामाजिक भूमिका पार पाडेल. त्यांच्या बाजूने जनतेचा कौल राहतो. जनता आपले मत चिकित्सकपो विचार करून टाकते. नेत्यांनी ५ वर्षे केलेल्या कार्याचा लेखाजोखा दै.वृत्तपत्राच्या माध्यमातून जनतेस वाचावयास मिळतो व त्याप्रमाणे आम जनता आपल्या मतांचा कौल त्या पक्षाच्या पारड्यात टाकत असते. वृत्तपत्रांची भूमिका ही निश्‍चितच सत्तापरिवर्तनामध्ये दिसून येते. म्हणून भारतीय निवडणुकामध्ये दै.वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वपूर्ण दिसून येते.

**२) रेडिओ -** रेडिओ हे एक सर्वसामान्य व आम जनतेपर्यंत ग्रामीण भगातील तळागळामधील व्यक्तींना आपल्या भाषेमध्ये एखादा विचार व मनोरंजनाचे सहज उपलब्ध होणारे प्रसार माध्यम आहे.

आकाशवाणी केंद्राचे ब्रिदवाक्य आहे - 'बहुजन हीताय, बहुजन सुखाय'. आपल्या देशातील कोणत्याही प्रांतील बातमी अगदी घरी बसल्या बसल्या आपण ऐकू शकतो. प्रादेशीक बातम्यांच्या माध्यमातून, व्यक्तीच्या मुलाखतीच्या माध्यमातून एखाद्या पक्षाने केलेले कार्य, एखाद्या व्यक्तीने समाजाच्या हिताचे केलेले कार्य अगदी मोजक्या शब्दामध्ये मांडण्याचे काम रेडिओ, आकशवाणीच्या माध्यमातून मांडलेले दिसून येते.

भारतीय निवडणुकांमध्ये रेडीओची भूमिका अगदी महत्त्वपूर्ण दिसून येते. एखाद्या पक्षाने विविध प्रांतामध्ये केलेल्या कार्याचा आढावा बातम्यांच्या माध्यमातून प्रसारीत केला जातो व त्याचा इफेक्ट डायरेक्ट जनतेच्या मनावर होत असतो. मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मन की बात ही भूमिका आकाशवाणी रेडीओच्या माध्यमातून भारतातील आज जनतेच्या मनावर राज केलेली दिसून येते.

जनतेचे जिवंत प्रश्न व त्यांचे उत्तर, प्रश्नांचे मार्ग, भविष्यातील प्लॅनींग, रेडओच्या माध्यमातून प्रसारीत केली जाते. निवडणुक कार्यकाळामध्ये थेट विचारांचा पक्षांचा भाव हा जाहीरात, बातम्या, मुलाखती अशा अनेक पैलुंच्या माध्यमातून केला जातो व त्याचा फायदा हा निवडणुकीमध्ये पक्षास होत असतो. म्हणूनप्रसार माध्यमांमध्ये 'रेडीओ' चा होणारा इफेक्ट हा थेट जनतेच्या मनावर राज्य बनूनजातो व त्याचा खूप फायदा त्या-त्या पक्षास झालेला दिसून येतो.

**३) दूरदर्शन -** दूरदर्शन (T.V.) व विविध चॅन्ल्सच्या माध्यमातून देशातील कार्याचे प्रत्यक्ष दर्शन या प्रसार माध्यमांतून झालेले दिसून येते. दूरदर्शन व चॅनल्स या प्रसार माध्यमांनी निवडणुकीमध्ये पक्षांच्या प्रचार व प्रसारासाठी अतीशय प्रभावशाली भूमिका मांडण्याचे कार्य केलेले दिसून येतात. लोकनेत्यांनी केलेले कार्य जनतेसमोर येऊन एखादी क्लीप ती सर्वत्र संपूर्ण देशामधील जनतेस प्रत्यक्ष पाहण्याचे संधीया माध्यमाद्वारे झालेली दिसून येते.

निवडणुक कालखंडामध्ये दूरदर्शन व चॅनल्सची भूमिका ही खूप महत्त्वाचे काम करते. दूरदर्शन हे प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते. दूरदर्शन व चॅनल्सने घेतलेली सत्य भूमिका ही त्या पक्षाच्या विजयासाठी खूप महत्त्वाची ठरते. त्यामुळे आज वर्तमानकाळात दूरदर्शन, ई.टी.व्ही., झी.टी.व्ही. अशा विविध चॅनलसच्या माध्यमातून निवडणुकीची रणधुमाळी दिसून येते व त्यातून जी भूमिका चॅलन्स घेतील, त्या पक्षाचा विजय हा निश्‍चित दिसून येतो. म्हणून निवडणूक प्रक्रियेमध्ये या प्रसार माध्यमांचे अगदी प्रभावीपणे कार्य दिसून येते.

**४) मासिके व ग्रंथ साप्ताहीक -** निवडणूक प्रसारामध्ये मासीक, ग्रंथ व साप्ताहीकांच्या माध्यमातून लेखकांचे सामाजिक कार्यकर्त्यांविषयकच्या भूमिका, देशात पक्षाचे कार्य, पक्षांची सामाजिक बांधीलकी, त्यांनी केलेल्या कामाचा आढावा कायमचा जनतेच्या मनावर बिंबविण्यासाठी मासिक, ग्रंथ व साप्ताहिकांच्या माध्यमातून कार्य केले जाते. विविध लेखक, समीक्षक, आपली मते लेखनीच्या माध्यमातून उमटवीली जातात.

लेखकांच सत्य लेखन निश्‍चितच त्या पक्षांाठी सकारात्मक राहते. निवडणुक कालखंडामध्ये साप्ताहिक व मासिकांची भूमिका ही जाहीरातीच्या माध्यमातून, वेगवेगळ्या कार्याचा आढावा आपल्या लेखनीतून लेखक लिहीत असतात. त्यामुळे पक्ष प्रबलतेमध्ये या प्रसारमाध्यमांची महत्त्वाची भूमिका दिसून येते.

**५) युट्युब, वॉटस्अप व फेसबुक -** सध्या वर्तमान कालखंडामध्ये अगदी आपले मत काही सेकंदामध्ये जनतेपर्यंत पोहचविण्याचा सोपा मार्ग म्हणजे युट्युब, वॉटसअप व फेसबुक ही प्रसार माध्यमे दिसून येतात. एखाद्या नेत्याने केलेल्या कार्याचा आढावा किंवा त्याचे विक पॉइंट जर या माध्यमांद्वारे प्रसारीत केले तर त्याचा इफेक्ट काही मिनिटामध्ये जनतेमध्ये पसरतो. सत्याचो पारडे जड होत जाते व जनतेला फसवणाऱ्या नेत्यास व पक्षास हानी पकत्करावी लागते.

म्हणून वॉटसप, युट्युब, फेसबुक हे प्रसारमाध्यमे खूप सेंसीटीव्ह आहेत. निवडणूक कालखंडामध्ये जो नेता पक्ष या प्रसार माध्यमांचा उपभोग करतो त्याचा फायदा निश्चितचनेत्यास व पक्षास दिसून येतो.

**समारोप -**

**प्रसार माध्यमांना सशक्त प्रबळ करणे -**

दै.वृत्तपत्रे, रेडीओ, दूरदर्शन, मासीके, ग्रंथ, यु ट्यूब, वॉटस्अप, फेसबुक इ. प्रसारमाध्यमे जर सत्याची भूमिका घेत असतील तर त्यांना विरोध करणारे समाजात काही घटक दिसून येतात. अनेक समीक्षक, लेखक, संपादक यांना आपल्या जिवाची पर्वा न करता आपले परखड मत मांडण्यासाठी भूमिका घ्यावी लागते. त्यामध्ये अनेकवेळा काही पत्रकारांना आपला जीव सुध्दा गमवावा लागलेला आहे.

प्रसार माध्यमांची वरील स्तंभ मजबूत करावयाची असतील तर त्यासाठी प्रबळ कलमांचा वापर करावा लागेल. तसेच समाजातील विविध संघटनांनी, शासनाने सेक्युरिटी देणे महत्त्वाचे आहे. एक प्रभावशाली भारत बनवायचा असेल तर प्रसारमाध्मयांनी घेतलेली निवडणुकीतील भूमिका असो किंवा विरांची भूमिका असो ही निश्चीतच समाजाला दिशा देण्याचे कार्य करेल हे निश्चित...!

**संदर्भ :-**

१) डॉ.बोरा, डॉ.शिरसाठ, लोकप्रशासन शास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पान नं.३६३.
२) मराठी विश्वकोश
३) डॉ.बोरा, डॉ.शिरसाठ, लोकप्रशासन शास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पान नं.३६४.
४) डॉ.बोरा, डॉ.शिरसाठ, लोकप्रशासन शास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पान नं.३६४.
५) दिनकर गांगल, कहानी वर्तमानपत्राची, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली, पान नं.८.
६) डॉ.प्रकाश मेदककर, उपयोजीत मराठी भाग -२, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद, पान नं.६४.
७) डॉ.मोहन दिवान, भारतीय राज्यांचे राजकारण, विद्या प्रकाशन नागपूर, पान नं.९७.
८) औचित्य बेजांमिन चार्ल्स, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार, यूगप्रवर्तक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पान नं.८१.
९) डॉ.प्रकाश मेदककर, उपयोजीत मराठी भाग -२, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद, पान नं.८१.
१०) डॉ.केशव तूपे, माध्यमांची भाषा आणि लेखन कौशल्ये, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पान नं.१०७.